**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' मध्ये प्रतिपादन.**
2. **छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा राज्यभरात उत्साह; शिवनेरीवर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शासकीय सोहळा संपन्न.**
3. **विदर्भात शिवाजी महाराज जयंती निमित्त वैविध्यपूर्ण कार्यक्रम.**
4. **महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंद्वारा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची घोषणा.**

---------------------------------------

इंडिया एआय इम्पॅक्ट समिट

कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असून, विशेषतः ग्लोबल साऊथसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत ,भारत मंडपम इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते. जगातली सर्वात मोठी तरुण लोकसंख्या, आणि सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रतिभेचं केंद्र असलेल्या भारतात, एआय, म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेवरच्या परिषदेचं आयोजन होत असून, ग्लोबल साऊथ मधल्या देशांसाठी ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असं ते यावेळी म्हणाले.

***(होल्ड बाईट- पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ सेकंद)***

कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक मूलभूत तंत्रज्ञान असून, लोकांच्या काम करण्याच्या, शिकण्याच्या आणि निर्णय घेण्याच्या पद्धतीमध्ये बदल घडवून आणत असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले. परिषदेत उपस्थित असलेल्या जागतिक नेत्यांचं स्वागत करताना ते म्हणाले की, सरकार एआय अंतर्गत सर्व ५ स्तरांवर काम करत आहे. सरकारने एक कॉमन कॉम्प्युट प्लॅटफॉर्म तयार केला असून, तो स्टार्टअप्स, संशोधक, शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या दरात ३८ हजार GPUs पर्यंत प्रवेश प्रदान करेल अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

---------------------------------------

शिवाजी महाराज जयंती-शिवनेरी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज साजरी होत आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवाजी महाराजांना आदरांजली वाहिली आहे. राधाकृष्णन यांनी, शिवाजी महाराज हे स्वराज निर्माता, धर्म रक्षक, निडर योद्धा असल्याचं आपल्या समाजमाध्यमांवरिल संदेशात म्हटलं आहे. तर पंतप्रधानांनी महाराजांना दूरदर्शी नेता, असाधारण प्रशासक, रणनीतिकार आणि स्वराज योद्धा म्हणत नमन केलं आहे. दरम्यान, शिवनेरी दुर्गावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत शिवजन्माचा सोहळा साजरा झाला. शिवरायांची पालखी पूजन तसंच पाळणा उत्सवात मुख्यमंत्री तसंच दोन्ही उपमुख्यमंत्री सहभागी झाले. मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलेल्या भाषणात चार वर्षांनी होणारा महाराजांचा चारशेवा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा मानस व्यक्त केला. ते म्हणाले…

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १६ सेकंद)***

शिवजन्मस्थळ असलेल्या शिवनेरी विकास आराखड्यासह इतरही स्मारकांसंदर्भात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा संकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचं, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी बोलतांना नमूद केलं.

---------------------------------------

शिवजयंती कार्यक्रम-विदर्भ

आज संपूर्ण महाराष्ट्रात शिवजयंतीचा जल्लोष पाहायला मिळतोय. विदर्भात देखील ठिकठिकाणी शिव जयंतीचा जल्लोष दिसत आहे. ऐकुया हा विशेष वृत्तांत आमच्या प्रतिनिधींकडून-

***(व्हॉइस कास्ट - हेमांगी)***

***नागपूरच्या महाल परिसरातही शिवराज्यभिषेक सोहळा समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पारंपारिक वाद्यांच्या गजरात पालखी सोहळ्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. आज पहाटे ५ वाजल्यापासूनच महाराजांच्या पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. या सोहळ्याचं मुख्य आकर्षण ठरलं ते महिलांचं मुद्रा पथक. या पथकातील महिलांनी वारकरी पेहरावात आणि शिस्तबद्ध सादरीकरणान सर्वांच लक्ष वेधून घेतल . महालच्या चौकात पालखीचे आगमन झाल्यानंतर महाराजांचा जलाभिषेक करण्यात आला. यावेळी ३९६ शिवप्रेमींनी रक्तदान करण्याचा संकल्प केला. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त नागपूर मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांनी शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक किल्ल्याची सुंदर प्रतिकृती तयार केली आहे. या उपक्रमाचा उद्देश कैद्यांच्या सर्जनशील प्रतिभेला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी सकारात्मक वातावरण निर्माण***

*करणे आहे. याशिवाय विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर आकाशवाणी कार्यालय यासह सरकारी आणि खाजगी कार्यालयांमध्ये शिवाजी जयंती निमित्त अभिवादन करण्यात आलं. श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संलग्नित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट इथं ३० हजार स्क्वेअर फुटांची भव्य रांगोळी आकर्षणाचे केंद्र ठरली. १५ विद्यार्थ्यांनी सहा दिवसांच्या अथक परिश्रमातून, ४० क्विंटल रांगोळी वापरून सिंहासनावर विराजमान महाराजांची प्रतिमा साकारली असून ही भव्य रांगोळी काढण्याचे महाविद्यालयातील हे तिसरे वर्ष आहे. तर अमरावतीत आज विदर्भस्तरीत 'शिवदौड' मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गोंदिया इथं भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शेकडो शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागासह जयस्तंभ चौकात पथनाट्य आणि शिवस्तुती सादर झाली. गडचिरोली इथं जिल्हा प्रशासन आणि क्रीडा विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आणि पदयात्रेच आयोजन करण्यात आल. वाशीम इथं शिवाजी महाराज चौकात भव्य 'शिवसृष्टी' साकारण्यात आली आहे. स्वराज्य स्थापनेचा इतिहास, गडकिल्ल्यांच्या मोहिमा आणि मावळ्यांचे बलिदान दर्शविणाऱ्या या देखाव्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष शिवकालीन वातावरणाचा अनुभव मिळत असून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. भंडारा जिल्ह्यात "जय शिवाजी जय भारत" पदयात्रेच आयोजन गांधी चौकातून करण्यात आल. तत्पूर्वी राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.ढोल-ताशा, पारंपरिक वेशभूषा, लेझीम, मैदानी खेळ आणि सांस्कृतिक सादरीकरणांसह काढलेल्या या पदयात्रेत शेकडो विद्यार्थी, अधिकारी आणि नागरिक सहभागी झाले होते. यवतमाळ मध्ये "जय छत्रपती शिवाजी" पदयात्रेचं आयोजन करण्यात आल. राष्ट्र आणि राज्याच्या शाश्वत विकासात युवांच मोलाच योगदान लक्षात घेऊन युवांमध्ये नेतृत्वगुण, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवा भाव, राष्ट्रभावना, सामाजिक सलोखा, स्वच्छता आणि पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करणे तसेच कला, संस्कृती आणि परंपरा जतन करण्याचा संदेश या पदयात्रेद्वारे देण्यात आला.*

---------------------------------------

शिवजयंती बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात खामगाव सह आदिवासी बहुल तालुका असलेल्या जळगाव जामोद इथं विविध स्तरातून शिव जयंती साजरी करण्यात आली. मोटार सायकल रॅली, नेत्रहीन लोक कलाकारांनी सादर केलेले पोवाडे, आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले.

---------------------------------------

महाराजस्व अभियान

शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची घोषणा केली आहे. हे अभियान, राज्यात सर्व नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रांत पुढील दोन महिन्यांत सहा दिवस राबवण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि महिलांसाठी महसूल विभागातल्या महत्त्वाच्या १५ प्रकारच्या सेवा एका दिवसात मार्गी लावल्या जाणार आहेत.

---------------------------------------

सचिन पायलट

व्यापार करार हे आर्थिक प्रगतीचे साधन असतात, परंतु ते समान अटींवर आणि परस्पर लोकहिताच्या आधारावर असले पाहिजेत. देशाच्या सार्वभौमत्वाचा त्याग करून गुलामीकडे नेणारे करार कदापी स्वीकारार्ह नाहीत. अमेरिकेबरोबरचा व्यापार करार, हा दबावाखाली केला असून, तो भारतातील अन्नदात्यांचा गळा घोटणारा आहे, असा आरोप अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी केला आहे.टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना, सचिन पायलट यांनी केंद्र सरकारवर तोफ डागली. भारत-अमेरिका व्यापार करारात, सरकारने भारतातील शेतकरी आणि शेती क्षेत्राच्या हितांच नुकसान केल आहे, ऊर्जा सुरक्षेशी तडजोड केली आहे. डिजिटल स्वायत्तता आणि डेटा गोपनीयतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, अशी टीका पायलट यांनी केली.

---------------------------------------

रमजान

मुस्लिम समाजामध्ये पवित्र समजला जाणारा रमजानचा महिना आजपासून सुरू झाला. काल संध्याकाळी देशाच्या अनेक भागात चंद्रदर्शन झालं. रमजान हा इस्लामिक दिनदर्शिकेतला नववा महिना आहे. महिन्याच्या शेवटी ईद-उल-फित्र साजरी केली जाते.

---------------------------------------

हंसराज अहीर

वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड अर्थात वेकोलि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या, अधिग्रहित जमिनीचा वाद, न्यायालय प्रलंबित प्रकरणाचे कारण सांगून प्रकल्पग्रस्तांची नोकरी आणि आर्थिक मोबदला वेकोलि प्रबंधनाकडून थांबविण्यात येत होता. याबाबत केंद्रीय कोळसामंत्री जी किशन रेड्डी यांच्या समवेत पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांची नोव्हेंबर आणि डिसेंबर 2025 रोजी बैठक झाली. त्यानुसार केंद्रीय कोळसा मंत्र्यांनी कोल इंडिया आणि वेकोली मुख्यालय, नागपूर यांना नियमात बदल करण्याचे

स्पष्ट निर्देश दिले असून, या निर्णयानुसार वेकोलि अंतर्गत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून हमीपत्र दाखल करवून घेत, नोकरी आणि मोबदला प्रदान करण्याची कारवाई लवकरच करण्यात येत असल्याच वेकोलि प्रबंधनान स्पष्ट केल आहे.

---------------------------------------

बसगाड्या खरेदी

एसटीच्या दीर्घकालीन धोरणानुसार पुढच्या काही वर्षांत २० ते २५ हजार बसगाड्या खरेदी करण्याला राज्य शासनाची तत्वतः मान्यता मिळाली असून, यंदा पहिल्या टप्प्यात ८ हजार ३०० गाड्या दाखल होणार आहेत. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

---------------------------------------

दहावीची परीक्षा

राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेला उद्या शुक्रवारपासून सुरुवात होणार आहे. राज्यभरातील सोळा लाखाहून अधिक विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. या परीक्षेत शंभर टक्के कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी तयारी करण्यात आली आहे. १८ मार्च पर्यंत दहावीची परीक्षा घेतली जाणार आहे.

---------------------------------------